| | | | |
|---|---|---|---|
| **MHKO100005982010** | दाखल दिनांक | :- | ०६/०७/२००९ |
| | नोंदणी दिनांक | :- | ०६/०७/२००९ |
| | निकाल दिनांक | :- | १६/०३/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | १६ ८ १० |

**नियमित फौजदारी खटला क्र.१३२/२०१०** **निशाणी क्र.७२ /ब**

**फॉर्म क्र.३२**

**भाग 'अ'**

**(निकालाचे शिर्षक पृष्ठ )**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| **गडहिंग्लज येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**<br>पिठासीन अधिकारी : डी.एम.पवार | | |
| गुन्हा नोंद क्र.१२/२००९ , गडहिंग्लज पोलीस ठाणे, गडहिंग्लज. | | |
| फिर्यादी / तक्रारदार | :- | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>गडहिंग्लज पोलीस ठाणे, गडहिंग्लज. |
| अभियोग पक्षातर्फे | :- | सहाय्यक सरकारी अभियोक्ता डी.ए.पांचाळ |
| आरोपी | | रामगोंडा कलगोंडा पाटील<br>वय-५२ वर्षे,धंदा-शेती,<br>रा. खणदाळ, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | एस. एन. फगरे |

**भाग-ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | सन २००६ ते २००८ या मुदतीत |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | ०६/०७/२००९ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | १९/११/२०१० |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ३०/१०/२०१४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | ०२/०९/२०१६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | - |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतीम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रामगोंडा कलगोंडा पाटील | ०४/११/२००९ | ०९/११/२००९ | भा.द.वि कलम ४०८, ४२०, ४२६ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | बाबालाल सिकंदर मकानदार | पंच साक्षीदार | १७ |
| २ | दुंडाप्पा बाळाप्पा गुडशी | फिर्यादी | २० |
| ३ | रमेश सिदगोंडा पाटील | साक्षीदार | ४८ |
| ४ | दिलीप ज्ञानदेव मगदूम | तपासी अधिकारी | ६२ |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १. | दोषारोपपत्र. |
| २ | २१ | फिर्याद |
| ३ | ४९ | पशुखादय खरेदी पावती |
| ४ | ५० | पशुखादय विक्री पावती |
| ५ | ६३ | तपास आदेश |
| ६ | ६४ ते ६७ | पंचनामे |

**न्या य नि र्ण य**

(दिनांक १६/०३/२०२६ रोजी घोषित केला)

प्रस्तुतच्या खटल्याअंतर्गत आरोपी यांनी भारतीय दंड संहिता कलम ४०८, ४२० व ४२६ अन्वये शिक्षेस पात्र असणा–या अपराधांकरीता

संपरिक्षा दिलेली आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

२. घटना सन २००६ – २००७ व २००७ – २००८ या कालावधीत लक्ष्मी सहकारी दुध व्यवसायीक संस्था मर्यादीत खणदाळ, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथे घडली आहे. आरोपीची फिर्यादी संस्थेच्या सचिव पदी दिनांक ११/०९/२००५ रोजी नेमणूक केली आहे. सचिव म्हणून आरोपीला संस्थेच्या जमा खर्चाच्या नोंदी, संस्थेत दररोज राहिलेली हात शिल्लक रक्कम, संस्थेचे प्रोसिडींग बुक, संस्थेच्या सभेचे कामकाजाचे इतिवृत्त प्रोसिडींग मध्ये लिहिणे, संस्थेच्या नोकराचा पगार देणे व त्याच्या नोंदी ठेवणे, दुध उत्पादक सभासदांना त्यांच्या हिशोबाप्रमाणे दुध बील वाटप करणे, दुध विक्री बिलाच्या जमा खर्चाच्या नोंदी ठेवणे, पशुखादय विक्री केलेल्या जमा खर्चाच्या नोंदी ठेवणे, संस्थेचे बँकिंग व्यवहार पाहणे व इतर खर्चाच्या नोंदी ठेवणे असे फिर्यादी संस्थेचे संपुर्ण व्यवहार आरोपीस करावे लागत होते.

३. फिर्यादी संस्थेची सन २००५–२००६ ते २००९–२०१० या कालावधीकरीता संचालक मंडळाची निवडणूक दिनांक १६/०४/२००६ रोजी घेण्यात आली होती व त्या निवडणूकीमध्ये रमेश सिध्दगोंडा पाटील यांचे पॅनेल निवडून आले व सदर संचालक मंडळातून चेअरमनपदी रमेश सिध्दगोंडा पाटील यांची निवड झाली होती. फिर्यादी संस्थेचे चेअरमन, व्हा. चेअरमन तसेच संचालक मंडळानी फिर्यादी संस्थेचे कारभाराबाबत व आर्थिक व्यवहाराबाबत आरोपी यांचे कामकाजावर लक्ष ठेवून संस्थेचे व्यवस्थापन पाहत होते. आरोपी हा फिर्यादी संस्थेचे दैनंदिन कामकाज निष्काळजीपणाने करत असल्याचे व फिर्यादी संस्थेचे दैनंदीन कामकाजात त्रुटी आढळून आल्यामुळे फिर्यादी संस्थेचे चेअरमन संचालक

मंडळानी आरोपी यांना माहिती व जाब विचारला असता आरोपीने कामावर येणे बंद केले.

४. फिर्यादी संस्थेचे संचालक मंडळी यांना दैनंदिन आर्थिक व्यवहाराबाबत संशय निर्माण झालेने फिर्यादी संस्थेचे विशेष लेखापरिक्षण होवून मिळावे म्हणून मा. महानिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) कोल्हापूर यांच्याकडे अर्ज केला. त्यानुसार फिर्यादी संस्थेचे दिनांक ०१.०४.२००६ ते ३१.०३.२००८ या कालावधीचे वैद्यानिक लेखापरिक्षण एस. एस. वर्णे लेखापरिक्षक श्रेणी–१, सहकारी संस्था (पदूम) उडते पथक कोल्हापूर यांनी पुर्ण केले आहे. सदर लेखापरिक्षणअंती फिर्यादी संस्थेमध्ये सन २००६ ते २००८ या कालावधीत रक्कम रूपये १,६३,६६४.४८/– चा आरोपी यांनी अपहार केलेल्या गैर व्यवहाराबाबत आरोपी यांना नोटीस पाठवून कळवले आहे. तसेच सन २००५–२००६ च्या अहवालातील दोषाबाबत कारवाई प्रलंबित असल्याबाबत संस्थेकडील रक्कम रूपये १,६३,६६४.४८/– इतक्या रक्कमेचा अपहाराबाबतच्या गंभीर मुद्दयाची तपशिलवार यादी आरोपी यांना कळवली. आरोपी हे फिर्यादी संस्थेचे सचिव म्हणून काम करत असताना गैरव्यव्यवहार करून फिर्यादी संस्थेचे रक्कमांचा अपहार केला आहे असे आरोपीस नोटीसने कळविले आहे.

५. सन २००६ ते २००७ या आर्थिक वर्षात रक्कम रूपये ९९,७३५.६६/– सन २००७–२००८ या आर्थिक वर्षात रक्कम रूपये ६१,७४८.८२/– असे एकूण रक्कम रूपये १,६३,६६४.४८/– इतक्या रक्कमेचा फिर्यादी संस्थेचा आरोपी यांनी व्हाउचर व कोणत्याही बिलाशिवाय तसेच तत्कालीन चेअरमन व संचालक मंडळाच्या पुर्वपरवानगी किंवा मंजूरी शिवाय किर्दीस रक्कम खर्ची टाकून अपहार केलेला आहे.

६. सन २००५–२००६ या सालचे लेखापरिक्षण अहवालातील गंभीर मुद्दयाबाबत व त्यावरील तपशिलाप्रमाणे अहवालाच्या बाबीचा प्रशासकीय विशेष अहवाल श्री. एम. एम. धर्माधिकारी, चार्टर्ड अकौंटट यांनी मा. सहा. निबंधक, सहकारी संस्था दुग्ध कोल्हापूर यांना अहवाल सादर केलेला असून सदर अहवालावर कारवाई प्रलंबित आहे. आरोपी यांनी सन २००५–२००६ साली सुध्दा फिर्यादी संस्थेमध्ये अपहार करून गंभीर स्वरूपाचा गुन्हा केला आहे.

७. आरोपी यांनी फिर्यादी संस्थेचे केलेले अपहाराबाबत व माननीय लेखा परीक्षण साो यांनी दिलेल्या अपहाराबाबत गंभीर मुद्दयाची तपशीलवार यादी व लेखा परीक्षण अहवालामधील त्रुटी यावरून यातील आरोपीस फिर्यादी संस्थेने ॲडव्होकेट युवराज जाधव यांच्या मार्फत रजिस्टर पोस्टाने नोटीस देवून खुलासा मागितला होता. परंतु आरोपीने तसे खुलासा दिलेला नाही.

८. आरोपी यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून फिर्यादी संस्थेचे वरीलप्रमाणे रक्कमेचा अपहार करून आर्थिक नुकसान करण्याचे हेतूने व स्वत:चे फायदयासाठी संस्थेचा विश्वासघात करून फिर्यादी संस्थेच्या रक्कमेचा अपहार केला आहे. सदर अपहार लक्षात येवू नये म्हणून पुरावा नष्ट करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न आरोपीने केला आहे.

९. लेखा परीक्षक यांनी लेखा परीक्षण करताना निदर्शनास आलेल्या गंभीर स्वरूपाची तपशीलवार यादी / सन २००६–२००७ अशा शिर्षकाची माहिती दिली आहे. सदर यादी ही या फिर्यादीचा भाग समजण्यात यावा.

**१०.** आरोपी यांनी फिर्यादी संस्थेत अपहार केल्याचे स्पष्ट झालेने फिर्यादी संस्थेच्या संचालक मंडळाची दिनांक ०१.०२.२००९ रोजी सभा होवून आरोपीविरूध्द फिर्याद दाखल करणे, जाब जबाब देणे, कागदपत्र हजर करणे व परत घेणे इत्यादी कोर्ट कामकाज पाहणेबाबत ठराव क्रमांक २ दिनांक ०१.०७.२००९ रोजी पारीत होवून संचालक मंडळानी सर्व अधिकार श्री. दुंडाप्पा बाळाप्पा गुडशी यांना दिले आहेत. त्यानुसार त्यांनी फिर्याद दाखल केली आहे.

**११.** सदर फिर्यादीवर आदेश पारीत करून सदर प्रकरण फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६(३) अन्वये चौकशीसाठी गडहिंग्लज पोलीस ठाणे येथे पाठविण्यात आले. चौकशीअंती आरोपीविरूध्द गडहिंग्लज पोलीस स्टशेनला एम. गु.र.नं.१२/२००९, भारतीय दंड संहिता कलम ४०८, ४२०, ४२६ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. सहा. फौजदार डी. डी. मगदूम यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपास पूर्ण झाल्यानंतर तपासी अधिकारी यांनी आरोपी यांचे विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**१२.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र.१० अन्वये वर नमुद कलमान्वये दोषारोप नोंदवून आरोप निश्चित केला. आरोपी यांनी गुन्हा नाकबूल करुन संपरीक्षेची मागणी केली. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन निशाणी ६९ प्रमाणे नोंदविण्यात आले. त्याचा संपुर्ण बचाव नकारात्मक स्वरूपाचा आहे.

**१३.** अभिलेखावरील साक्षीपुराव्यावरुन खालील मुद्दे खटल्याच्या विचारार्थ उपस्थित झाल्याने त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सन २००६ - २००७ व २००७ - २००८ या कालावधीत लक्ष्मी सहकारी दुध व्यवसायीक संस्था मर्यादीत खणदाळ, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथे सचिव म्हणून कार्यरत असताना व्हाउचर व कोणत्याही बिलाशिवाय किर्दीस रक्कम खर्ची टाकून रोख रक्कम रूपये १,६३,६६४.४८/- इतक्या रक्कमेचा अपहार करून फौजदारीपात्र न्यास भंग केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| २ | वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपी यांनी व्हाउचर व कोणत्याही बिलाशिवाय किर्दीस रक्कम खर्ची टाकून रोख रक्कम रूपये १,६३,६६४.४८/- खर्च झाल्याचे दाखवून फिर्यादी संस्थेची फसवणूक केली, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| ३ | वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपी यांनी फिर्यादी संस्थेचे रक्कम रूपये १,६३,६६४.४८/- चे नुकसान करून आगळीक केली, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| ४ | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**१४.** आरोपीवरील दोषारोपाच्या शाबीतीसाठी अभियोगपक्षाने वर नमुद केल्याप्रमाणे साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ डी. ए. पांचाळ यांनी असा युक्तीवाद केला की,अभियोग पक्षाने नोंदविलेल्या पुराव्यावरून आरोपीवरील आरोप सिद्ध झाले आहेत. त्यामुळे आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती त्यांनी केली.

**१५.** आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एन. फगरे यांनी असा युक्तीवाद केला की, लेखापरीक्षक यांनी सदर फिर्याद दाखल केली नाही. आरोपीकडे फिर्यादी संस्थेची मालमत्ता दिली होती का हे अभियोग पक्षाने सिद्ध केले नाही. अभियोग साक्षीदार क्र.१ मकानदार याने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. लेखा परीक्षक वर्णे यांची साक्ष अभियोग पक्षाने नोंदवली नाही. आरोपीच्या सहया संस्थेच्या अभिलेखावर आहेत, हे देखील अभियोग पक्षाने सिद्ध केले नाही. अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द केलेले कथन अभिलेखावरील पुराव्यावरून सिद्ध झाले नाहीत. तरी आरोपीस निर्दोष मुक्त करण्याची विनंती त्यांनी केली.

**मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता –**

**१६.** वरील तिन्ही मुद्दे हे एकाच घटनेशी संबंधित असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी चर्चेसाठी एकत्र घेत आहे. फिर्यादी अ.सा.क्र.१ गुडशी यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले की, आरोपी सन २००५ ते २००८ पर्यत फिर्यादी संस्थेत सचिव म्हणून काम करत होता. सचिव या नात्याने दुध संकलन करणे, बिले तयार करणे, पशु खादय विक्री करणे व आर्थिक व्यवहार पाहणे, इत्यादी कर्तव्ये आरोपी करत होता. दिनांक १६/०४/२००६ रोजी संस्थेची निवडणुक झाली व रमेश पाटील यांचे पॅनेल निवडुन आले. नवीन निवडुन

आलेले चेअरमन रमेश पाटील यांच्या निदर्शनास आरोपीने गैरव्यवहार केलेचे आढळून आले, म्हणून सन २००७ मध्ये संस्थेचे लेखापरिक्षण श्री.वर्णे व श्री.धर्माधिकारी यांनी केले. त्या लेखापरिक्षणात आरोपीने रक्कम रू १,६३,६६४.४८/– चा अपहार केल्याचे निदर्शनास आले. आरोपीने हात शिल्लक रक्कम वापरली होती. म्हणून त्यांनी आरोपीविरूध्द तक्रार ( नि.२१) दाखल केली. आरोपीविरूध्द तक्रार दाखल करणेचा अधिकार त्यांना फिर्यादी संस्थेने ठराव ( अर्टिकल अ) पारीत करून दिला होता.

**१७.** त्यांच्या उलटतपासात त्यांनी असे कथन केले की, तेव्हा ते एप्रिल २००६ ते ऑक्टोबर २००७ या कालावधीत चेअरमन होते. चेअरमन म्हणून त्यांच्या निवडीचे पत्र त्यांनी हजर केले नाही. एप्रिल २००६ मध्ये त्यांनी आरोपीकडून संस्थेचा मागील हिशोब व चेअरमन पदाचा चार्ज घेतला होता. त्यांनी सरतपासात एप्रिल २००६ मध्ये झालेल्या निवडणुकीनंतर रमेश पाटील हे नवीन चेअरमन म्हणून निवडुन आले होते असे कथन केले आहे, परंतु रमेश पाटील की फिर्यादी संस्थेचे चेअरमन म्हणून काम पाहत होते, याबाबत त्यांनी कोणताही पुरावा दाखल केला नाही.

**१८.** अर्टिकल 'अ' वरील ठरावानुसार फिर्यादी संस्थेने फिर्यादीस आरोपीविरूध्द फिर्याद दाखल करण्याचे अधिकार दिले होते. त्यानुसार फिर्यादी हे संस्थेचे सदस्य होते. असे असताना त्यांनी संस्थेचे चेअरमन होते , हे केलेले कथन चुकीचे दिसून येत आहे.

**१९.** आरोपीने फिर्यादी संस्थेत सचिव म्हणून काम करत असताना रक्कम रू . १,६३,६६४.४८/– या रक्कमेचा अपहार केला हे सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपी ; फिर्यादी संस्थेत सचिव म्हणून कार्यरत होता हे अगोदर सिद्ध करणे गरजेचे आहे. फिर्यादी गुडशी यांनी त्यांच्या उलटतपासात आरोपीची

संस्थेत सचिव पदी नेमणुक करण्यात आली होती याबाबतचा आदेश त्यांनी याकामी दाखल केला नाही असे कथन केले आहे. त्यामुळे आरोपी फिर्यादी संस्थेत सचिव म्हणून काम करत होता हे सिद्ध करण्यासाठी कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल नाही.

**२०.** आरोपीने फिर्यादी संस्थेत रक्कम रू. १,६३,६६४.४८/- चा अपहार केला हे सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने लेखापरीक्षक संदीप वर्णे व धर्माधिकारी यांनी केलेले लेखापरीक्षण व त्यानुसार दिलेला अहवाल याचा आधार घेतला आहे. लेखापरीक्षण अहवाल सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने संदीप वर्णे व धर्माधिकारी यांची साक्ष नोंदवली नाही.

**२१.** अभियोग साक्षीदार क्रमांक ३ रमेश पाटील यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, आरोपीने पशुखाद्य बिलाची रक्कम दुध बिलातून कपात केली होती, परंतु ती रक्कम किर्दमध्ये खर्ची दाखविली नव्हती. आरोपीने ते पैसे परस्पर वापरले व त्याची नोंद पशुखाद्य रजिस्टरला केली नव्हती. आरोपीने कोणती वस्तु खरेदी केली तर त्याचे व्हाउचर न दाखवता पैसे स्वत:साठी वापरले. अशा तऱ्हेने आरोपीने रक्कम रू.१,६३,६००/- स्वत:साठी वापरले. शासकीय ऑडीट झाल्यानंतर सदरची बाब निदर्शनास आली.

**२२.** पशुखाद्य विक्री रजिस्टर मध्ये त्यांनी पशुखाद्य खरेदी केलेबाबत त्यांच्या नावाची नोंद व त्यांची सही ( नि.५०)असल्याचे त्यांनी मान्य केले. तसेच त्यांनी पशुखाद्य खरेदी केलेबाबतची जमापावती पुस्तकातील कार्बन प्रत (नि.४९) त्यांनी मान्य केली. पशुखाद्य खरेदी केलेबाबत त्यांच्या नावाची नोंद पशुखाद्य विक्री रजिस्टरमध्ये करण्यात आली व त्याबाबतची पावती त्यांना दिली होती ही वस्तुस्थिती निशाणी ४९ व ५० वरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दिसून येते. या दोन्ही कागदपत्रांवर आरोपीची सही आहे, असे त्यांचे कथन

नाही. तसेच या दोन्ही कागदपत्रांवरून आरोपीने फिर्यादी संस्थेत अपहार केला हे दिसून येत नाही.

२३. फिर्यादी गुडशी यांनी त्यांच्या उलटतपासात आरोपीची फिर्यादी संस्थेमार्फत खातेनिहाय चौकशी करण्यात आली नव्हती व तशी चौकशी करण्यास संस्थेला काही अडचण नव्हती असे त्यांनी कथन केले आहे. आरोपी नंतर बसवराज शिवाप्पा चौगुले हे संस्थेचे सचिव म्हणून काम पाहत होते. त्यांची देखील साक्ष अभियोग पक्षाने नोंदवली नाही.

२४. अभियोग साक्षीदार क्र.४ डी.डी.मगदुम हे तपासी अंमलदार आहेत. त्यांच्या साक्षीदरम्यान त्यांनी लेखा परीक्षक संदीप वर्णे व संस्थेचे सचिव चौगुले यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे पंचासमक्ष जप्ती पंचनामे (नि.६४ ते ६७) केले असे कथन केले आहे. त्यांनी आरोपीचे हस्ताक्षर , नमुने व अभिलेख हस्ताक्षर तज्ञ यांचेकडे तपासासाठी पाठवले होते. लेखापरीक्षक वर्णे यांचा जबाब त्यांनी नोंदवला होता असे त्यांनी कथन केले .

२५. त्यांनी उलटतपासात असे कथन केले की, आरोपी फिर्यादी संस्थेत सचिव म्हणून कार्यरत होता असा आदेश त्यांनी याकामी दाखल केला नाही. आरोपीला संस्थेचे बॅंकेतील पैसे काढण्याचा अधिकार आहे असा ठराव त्यांनी याकामी दाखल केला नाही. त्यांनी संस्थेचे सचिव बसवराज चौगुले यांचा जबाब नोंदवला नाही. फिर्यादी संस्थेने अपहाराबाबत सहकार खात्याकडे तक्रार केली होती का याबाबत त्यांना माहिती नाही. लेखापरीक्षक धर्माधिकारी यांचा जबाब त्यांनी नोंदवला नाही.

२६. अभियोग साक्षीदार क्र.१ बाबालाल मकानदार हे निशाणी ६४ वरील पंचनाम्याचे पंच आहेत. त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही, म्हणून

उलटतपासात विचारले जाणारे प्रश्न अभियोग पक्षातर्फे त्यांना विचारण्यात आले. त्यामधून देखील अभियोग पक्षास उपयुक्त ठरेल अशी माहिती अभिलेखावर आली नाही.

२७. तपासी अंमलदार यांच्या साक्षीवरून निशाणी ६४ ते ६७ वरील पंचनामे सिद्ध झाले आहेत. निशाणी ६४ वरील पंचनाम्यानुसार फिर्यादी संस्थेचे सचिव बसवराज चौगुले यांनी दाखल केलेले संस्थेचे अभिलेख जसे की, रोज किर्द, किर्द बुक, खतावणी बुक, लेजर बुक, बोनस रजिस्टर, पेमेंट रजिस्टर, डेड स्टॉक रजिस्टर, किरकोळ दुध विक्री रजिस्टर, पशुखाद्य विक्री रजिस्टर, कॅश क्रेडीट मेमो, निवडणुक भत्ता पत्रक, इत्यादी लेखापरीक्षक वर्णे यांचेसमक्ष हजर केल्याने ते तपासी अंमलदार यांनी जप्त केले. तसेच निशाणी ६५ वरील पंचनाम्यानुसार जमापावती बुक आणि निशाणी ६६ वरील पंचनाम्यानुसार आरोपीचा मुलगा संतोष याच्याकडून आरोपीचे हस्ताक्षर असलेली जुनी वही जप्त करण्यात आली होती. निशाणी ६७ वरील पंचनाम्यानुसार आरोपीचे हस्ताक्षर नमुने घेण्यात आले होते. निशाणी ६४ ते ६७ वरील पंचनाम्यानुसार वर नमुद अभिलेख जप्त करण्यात आला आहे, परंतु त्या जप्त अभिलेखातील मजकुर अभियोग पक्षाने अभिलेखावर दाखल केलेल्या पुराव्यानुसार सिद्ध झाला नाही.

२८. आरोपीच्या मुलाने आरोपीचे हस्ताक्षर असलेली वही तपासी अंमलदार यांना आणुन दिली होती. त्यानुसार त्यांनी आरोपीचे हस्ताक्षर, नमुने व अभिलेख हस्ताक्षर तज्ञ यांच्याकडे तपासासाठी पाठविले होते, परंतु त्याचा अहवाल अभिलेखावर दाखल नाही.

२९. लेखापरीक्षक वर्णे व धर्माधिकारी यांनी केलेले लेखापरीक्षण सिद्ध करण्यासाठी त्यांची साक्ष नोंदवण्यात आली नाही. फिर्यादी गुडशी व अभियोग साक्षीदार क्र.३ रमेश पाटील यांच्या साक्षीवरून आरोपीने फिर्यादी संस्थेत रक्कम

रू. १,६३,६६४.४८/– चा अपहार केला हे सिद्ध होत नाही.

**३०.** वरील सर्व चर्चेनुसार व अभिलेखावरील पुराव्यानुसार आरोपी फिर्यादी संस्थेत सचिव म्हणुन काम करत असताना त्याने रक्कम रू १,६३,६६४.४८/– चा अपहार केला व ती रक्कम स्वत: साठी वापरून फिर्यादी संस्थेची फसवणुक करून फौजदारी पात्र न्यास भंग केला हे सिद्ध झाले नाही. म्हणून मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविला आहे.

**मुद्दा क्र. ४ करिता –**

**३१.** मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्षावरून आरोपीवरील आरोप सिद्ध झाले नाहीत. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. फिर्यादी संस्थेचे जप्त केलेले सर्व रजिस्टर अपील कालावधीनंतर त्यांना परत करणे योग्य होणार आहे. सबब मुद्दा क्रमांक ३ च्या निष्कर्षाबाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ आरोपीस भारतीय दंड संहितेच्या कलम ४०८, ४२० व ४२६ अन्वये शिक्षेस पात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९०८ कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२ आरोपीचा जामीन कदबा व जातमुचलका रद्द करण्यात येतो.

३ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम रु.१५,०००/– (रुपये पंधरा हजार फक्त) चे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे.

४ फिर्यादी संस्थेचे जप्त केलेले सर्व रजिस्टर अपील कालावधीनंतर फिर्यादी संस्थेस परत देण्यात यावीत.

५ मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रंजना शांतीलाल सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुलसीराम गुप्ता, क्रिमीनल ॲप्लीकेशन नं. ३८०/२०१९ मधील क्रिमीनल अपील (एस. टी) नं. ३९०/२०१९ या न्यायनिवाडयामध्ये निर्देशित केलेप्रमाणे या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सत्वर पाठविण्यात यावी.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.03.17 10:48:00 +0530

दिनांकः १६/०३/२०२६.
ठिकाण – गडहिंग्लज.

डी. एम. पवार
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र. २)
गडहिंग्लज.